महत्त्वाचे

मुरुडमध्ये नायब तहसीलदारांचा गौरव

आगरदांडा : कोरोनाच्या काळात स्वत:च्या कुटुंबाची पर्वा न करता, शूर योद्ध्याप्रमाणे कोरोना संकटाचा मुकाबला करण्यासाठी कार्यरत, तसेच निसर्ग चक्रीवादळात अनेकांची घरे, नारळ-सुपारीच्या बागा उद्ध्वस्त झाल्या होत्या. त्याचे जलदगतीने पंचनामे करुन लवकर भरपाई देण्याचे काम केल्याबद्दल जिल्हाधिकारी निधी चौधरी यांच्या हस्ते मुरुड नायब तहसीलदार रवींद्र सानप यांचा कोविड योद्धा म्हणून सन्मानपत्र देऊन गौरव केला, तसेच तहसीलदार गमन गावित, नायब तहसीलदार गोविंद कोतुम्बे, अव्वल कारकुन निला म्हात्रे, लिपिक सुग्रीव वाघ, लिपिक संदेश पाटील, शिपाई संदेश वाळंज, कोतवाल संदीप कोम आदींना सन्मानित करण्यात आले.

तळा येथे कोरोनामुक्त पोलिसाचे स्वागत

तळा : तळा पोलीस ठाण्याचे पोलीस कॉन्स्टेबल गोविंद शिंदे यांचा कोविड १९चा अहवाल ८ जुलै रोजी पॉझिटिव्ह आला होता. यानंतर, पत्नीसह त्यांच्या मुलाचाही कोरोना अहवाल पॉझिटिव्ह आला होता. मात्र, अशा परिस्थितीतही खचून न जाता, त्यांनी धैर्याने संकटाचा सामना केला व कोरोनासारख्या भयंकर आजारावर मात करून, पुन्हा आपल्या कर्तव्यावर हजर झाले. यावेळी पीएसआय मोहिते, पोलीस निरीक्षक गेंगजे व सहकाऱ्यांनी पुष्पगुच्छ देत फुलांचा वर्षाव करुन पोलीस ठाण्यात स्वागत केले.

नाना शंकरशेठ यांना अभिवादन

आगरदांडा : थोर समाजसुधारक जगन्नाथ तथा नाना शंकरशेठ यांच्या १५५व्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आले. मुरुड दैवज्ञ समाजाचे सचिव ओमकार पोतदार, दैवज्ञ समाजाचे अध्यक्ष अच्युत पोतदार, महिला अध्यक्ष वासंती उमरोटकर, माजी अध्यक्ष दीपक राजपूरकर आदींनी नानाच्या प्रतिमेस पुष्पवृष्टी करुन अभिवादन केले.

विद्यार्थ्यांचा गुणगौरव

नागोठणे : नुकत्याच जाहीर झालेल्या दहावी परीक्षेच्या निकालात येथील नागोठणे एज्युकेशन सोसायटीच्या उर्दू हायस्कूलच्या अस्मिन इरफान मुल्ला (९३.४० टक्के), रैहान युसुफ शेख (८५.६० टक्के) आणि नाजिला निसार म्हैसकर (८२.२०) या विद्यार्थिनींनी अनुक्रमे पहिले तीन क्रमांक प्राप्त केले. या शाळेचाही १०० टक्के निकाल लागला होता. विद्यार्थांनी मिळविलेल्या यशाबद्दल त्यांचा संस्थेचे अध्यक्ष समदशेठ अधिकारी यांचे हस्ते गुणगौरव करण्यात येऊन भावी शिक्षणासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. या वेळी संस्थेचे उपाध्यक्ष, सचिव आदी मान्यवर उपस्थित होते.

जिल्हाधिकाऱ्यांच्या सूचना : गणेशोत्सव साजरा करण्यासाठी नियमावली

सार्वजनिक गणपतीची प्रतिष्ठापना करण्याचे टाळावे

लोकमत न्यूज नेटवर्क

रायगड : गणेशोत्सवाचा सण साजरा करण्याची सर्वांनाच घाई झाली असेल, परंतु सण साजरा करण्याआधी जरा थांबा. कारण सरकार आणि प्रशासनाने कोरोनाच्या पार्श्वभूमीवर उत्सव साजरा करताना काही नियम आणि अटी आहेत. सार्वजनिक गणेशोत्सवासाठी मंडळांनी या वर्षी सार्वजनिक गणपतीची प्रतिष्ठापना करण्याचे टाळावे, असे आवाहन जिल्हाधिकारी चौधरी यांनी केले आहे.

विघ्नविनाशक मोरया

सार्वजनिक गणपतीची प्रतिष्ठापना करायचीच असेल, तर संबंधित तालुक्यांचे तहसीलदार, पोलीस निरीक्षक यांच्याकडून आवश्यक ती पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

कोरोना जागतिक महामारीच्या पार्श्वभूमीवर मार्गदर्शक सूचना जिल्हाधिकारी निधी चौधरी २९ जुलै रोजी जारी केल्या आहेत. यामध्ये प्रामुख्याने यंदा गणेशोत्सव कसा साजरा करावा? गणेशमूर्तींची उंची किती असावी? विसर्जन कधी करावे? हे मार्गदर्शक सूचनांमध्ये स्पष्ट करण्यात आले आहे. कोविड १९ मुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य परिस्थितीचा विचार करता, तसेच न्यायालयाने निर्गमित केलेले आदेश, तसेच संबंधित स्थानिक प्रशासनाचे मंडपाबाबतचे धोरण याच्याशी सुसंगत असे मर्यादित स्वरूपाचे मंडप उभारण्यात यावेत. या वर्षीचा गणेशोत्सव साध्या पद्धतीने साजरा करणे अपेक्षित आहे.

श्रीगणेशाची मूर्ती सार्वजनिक मंडळांसाठी ४ फूट व घरगुती गणपती २ फुटांच्या मर्यादित राहील, याची दक्षता घ्यावी. या वर्षी शक्यतो गणेशोत्सव कमीतकमी दिवस साजरा करावा, तसेच पारंपरिक गणेशमूर्तीऐवजी घरातील धातू, संगमरवर आदी मूर्तीचे पूजन करावे, मूर्ती शाडूची पर्यावरणपूरक असल्यास त्याचे विसर्जन शक्यतो घरच्या घरी करावे. विसर्जन घरी करणे शक्य नसल्यास नजीकच्या कृत्रिम विसर्जनस्थळी विसर्जन करण्यात यावे. गणेशमूर्तीचे विसर्जन पुढे ढकलणे शक्य असल्यास, या मूर्तीचे विसर्जन माघी गणेशोत्सव विसर्जनावेळी किंवा २०२१ च्या भाद्रपद महिन्यात पुढील वर्षांच्या विसर्जनावेळी करता येणे शक्य आहे. जेणेकरून आगमन विसर्जनासाठी गर्दीत जाणे टाळणे शक्य होणार आहे.

उत्सवाकरिता वर्गणी/देणगी स्वेच्छेने दिल्यास त्यांचा स्वीकार करावा, परंतु घरोघरी जाऊन वर्गणी मागण्यास मनाई असेल. या वर्षी गणपती उत्सवासाठी पर राज्यातून, पर जिल्ह्यातून येणाऱ्या भविकांनी रायगड जिल्ह्यात ७ ऑगस्टपूर्वी दाखल होण्याचे आहे व तद्नंतर १४ दिवस 'होम क्वारंटाइन' राहण्याचे आहे. या आदेशाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी ग्रामीण भागात स्थापित कोरोना प्रतिबंधक ग्राम समिती व मुख्यत्वे करून संबंधित ग्रामपंचायत सरपंच यांची राहील, तसेच शहरी भागात संबंधित मुख्याधिकारी, नगरपालिका, नगरपंचायत यांची राहील.

धार्मिक कार्यक्रमांना कमाल १० व्यक्तिंना परवानगी

१ आरती, भजन, कीर्तन वा अन्य धार्मिक कार्यक्रम आयोजित करताना गर्दी होणार नाही, तसेच ध्वनिप्रदूषणाच्या संदर्भातील नियमांचे, तरतुदीचे पालन करण्यात यावे. आरती, भजन, कीर्तन अथवा अन्य धार्मिक कार्यक्रमांना कमाल १० व्यक्तिंना परवानगी असेल.

२ गणेशोत्सवादरम्यान घरगुती गणपतींच्या दर्शनासाठी गृहभेटी देणे टाळावे, तीर्थप्रसादासाठी, महाप्रसादासाठी उपस्थिती टाळावी. श्रीगणेशाच्या दर्शनाची सुविधा ऑनलाइन, केबल नेटवर्क, वेबसाइट, फेसबुक आदीद्वारे उपलब्ध करुन देण्याबाबत जास्तीतजास्त व्यवस्था करण्यात यावी.

३ जणेकरुन गर्दी कमी होईल. या कालावधीत गणपती मंडळाला भेटी दिलेल्या ठिकाण, कार्यालय, व्यक्ती यांची नोंद करण्यासाठी स्वतंत्र नोंदवही ठेवावी, जेणेकरुन कदाचित संशयित रुग्ण आढळल्यास कॉन्टॅक्ट ट्रेसिंग करणे सोयीचे ठरेल.

दिवसातून ३ वेळा मंडप परिसराचे सॅनिटायझेशन करावे

गणपती मंडपांमध्ये निर्जंतुकीकरणाची, तसेच सॅनिटायजिंग, थर्मल स्क्रीनिंगची पर्याप्त व्यवस्था करण्यात यावी. प्रत्यक्ष येऊन दर्शन घेऊ इच्छिणाऱ्या भाविकांसाठी शारीरिक अंतराचे, तसेच स्वच्छतेचे नियम (मास्क, सॅनिटायजर इत्यादी) पाळण्याकडे विशेष लक्ष देण्यात यावे, तसेच दिवसातून ३ वेळा मंडप परिसराचे सॅनिटायझेशन करावे. श्रींच्या आगमन व विसर्जन मिरवणुका काढण्यात येऊ नयेत. सार्वजनिक स्थळी विसर्जन करण्यासाठी गर्दी करु नये. विसर्जनाच्या पारंपरिक पद्धतीत विसर्जन स्थळी होणारी आरती घरीच करुन विसर्जन स्थळी कमीतकमी वेळ थांबावे. लहान मुले आणि वरिष्ठ नागरिकांनी सुरक्षेच्या दृष्टीने विसर्जन स्थळी जाणे टाळावे. संपूर्ण चाळीतील, इमारतीतील सर्व घरगुती गणेशमूर्तींच्या विसर्जनाची मिरवणूक एकत्रितरीत्या काढण्यात येऊ नये. विसर्जनासाठी प्रत्येकाने वैयक्तिक न जाता, कॉलनी, आळीतले गणपती हातगाडी, ट्रक, टेम्पो आदीमध्ये ठेवून सर्व गणपतींचे फक्त २ ते ३ व्यक्तिंद्वारे विसर्जन करावे.

'बलात्कारप्रकरणी सर्वच नराधमांना फाशीची शिक्षा द्या'

लोकमत न्यूज नेटवर्क

धाटाव: रोहा तालुक्यातील तांबडी येथील अल्पवयीन मुलीवरील नुकत्याच झालेल्या सामूहिक अत्याचार व हत्येप्रकरणी सापडलेल्या सर्वच नराधमांना फाशीची शिक्षा द्या, अशी मागणी रोहा तालुका सकल मराठा समाजाच्या वतीने करण्यात आली. रोहा प्रांताधिकारी व विभागीय पोलीस अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

सकल मराठा समाजाचे रायगड जिल्हा समन्वयक विनोद साबळे यांनी घडलेल्या कृत्याचा सर्वप्रथम जाहीर निषेध केला. तांबडी येथील म्हांदलेकर कुटुंबीयांची सांत्वनपर भेट घेऊन संपूर्ण रायगड जिल्ह्यातील मराठा समाज आपल्या पाठीशी असल्याचे सांगितले. त्यानंतर रोह्याचे प्रांताधिकारी यशवंत माने व विभागीय पोलीस अधिकारी सूर्यवंशी यांना या मागणीबाबतचे निवेदन दिले.

पोलिसांनी या प्रकरणात ज्या आरोपींना अटक केली आहे. त्यांनी गुन्हा कबूल केला असल्याने, कायद्याने त्यांच्यावर लवकरात लवकर गुन्हा सिद्ध करून त्यांना फाशीची शिक्षा होण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. या घटनेची तीव्रता प्रत्येक माणसाचे हृदय पिळवटून टाकणारी आणि संतापजनक असल्याने संपूर्ण रोहा तालुका हादरून गेला आहे. समाज भावना अत्यंत आक्रमक आहेत, असे या निवेदनात म्हटले आहे.

याप्रसंगी रोहा तालुका सकल मराठा समाज अध्यक्ष प्रदीप देशमुख, महेश सरदार, दशरथ साळवी, संदीप सरफळे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

ऑनलाइन शिक्षणाबाबत पालक चिंताग्रत

अनेकांचा विरोध : सुविधा नसल्याने अडचणी

लोकमत न्यूज नेटवर्क

आगरदांडा : कोविडच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे उद्भवलेल्या परिस्थितीत राज्यातील शाळा प्रत्यक्षात सुरु करणे शक्य नसल्याने, १५ जूनपासून शैक्षणिक वर्ग सुरु करुन स्थानिक परिस्थितीनुसार प्रत्यक्ष शाळा सुरु करण्याबाबत निर्णय घेण्याचे अधिकार संबंधित जिल्हाधिकारी व संबंधित शाळा व्यवस्थापन समिती यांना घेण्याचे आदेश काढण्यात आले होते. त्या अनुषंगाने तालुक्यातील मुख्याध्यापक सर्व शाळांना ऑनलाइन अभ्यासक्रम कधी आणि किती घ्यावा, याचे परिपत्रक दिले आहे. त्याप्रमाणे, आदेश मुरुड पंचायत समिती गटशिक्षणाधिकारी यांनी काढल्यानंतर विद्यार्थी व पालक चिंताग्रस्त झाले आहेत. तर काही सधन आणि एकुलते एक मूल असणाऱ्या पालकांनी ऑनलाइन शिक्षणाचा मार्ग आनंदाने अनुसरला आहे. तरी त्याला विरोध करणाऱ्या पालकांचीही संख्या दखल घेण्याजोगी आहे. बऱ्याच शाळांच्या ग्रुपवर याबाबतच्या चर्चा सुरु आहे.

ऑनलाइन शिक्षणासाठी काही शाळा सज्ज असल्या, तरी मुरुडमध्ये इंटरनेट नेटवर्कची मोठी अडचण आहे. वारंवार वीजपुरवठा खंडित होतो, त्यामुळे वाय-फाय चालत नाही. ऑनलाइन शिक्षणामुळे मुलांना विषयांचे आकलन पटकन होणार नाही, तसेच शंका विचारता येणार नाहीत. ३० टक्के मुलांकडे अँड्रॉइड फोनच नाहीत व घेण्यासारखी परिस्थिती नाही. इंटरनेटसह मोबाइल हातात आला की, मुले गेम, चॅटिंग किंवा नको त्या विषयांकडे वळतील, तीन तास मोबाइलवर राहिल्याने डोळे खराब होतील, आशी भीती पालकांना आहे.

ऑनलाइन शिक्षण कसे होणार? पालकांपुढे प्रश्न

बऱ्याच मुलांचे दोन्ही पालक नोकरी करत असल्याने, भ्रमणध्वनी घरी ठेवणे त्यांना शक्य नाही. पालकांनी नवा भ्रमणध्वनी खरेदी करावा, अशी शाळेची अपेक्षा आहे. ज्यांच्या दोन मुलांची शाळा एकाच वेळी भरते, अशा पालकांनाही हाच सल्ला दिला जातो. इलेक्ट्रॉनिक उपकरणांची विक्री वाढावी, म्हणून ऑनलाइन शिक्षण सुरु झाले आहे का, अशी शंका पालक उपस्थित करीत आहेत. पालक कार्यालयात गेल्यावर काही मुले आजी-आजोबांबरोबर असतात. त्यांना इलेक्ट्रॉनिक उपकरणे हाताळता येत नाहीत. काहींकडे इंटरनेट नाही, अशा अनेक तक्रारींचा पाढा पालक वाचत आहेत.

वेळापत्रक जारी

ऑनलाइन वर्ग १६ ऑगस्टपासून सुरु होणार आहेत. शिक्षणाचा कालावधी पूर्व प्राथमिक सोमवार ते शुक्रवार ३० मिनिटे, पालकांशी संवाद व त्यांना मार्गदर्शन. पहिली ते दुसरी सोमवार ते शुक्रवार प्रत्येक दिवशी ३० मिनिटांचे दोन सत्रापर्यंत. त्यापैकी १५ मिनिटे पालकांशी संवाद व मार्गदर्शन आणि १५ मिनिटे विद्यार्थांना उपक्रम आधारित शिक्षण. तिसरी ते आठवी सोमवार ते शुक्रवार प्रत्येक दिवशी ४५ मिनिटांचे दोन सत्रापर्यंत शिक्षण, नववी ते बारावी सोमवार ते शुक्रवार प्रत्येक दिवशी ४५ मिनिटांचे चार सत्रापर्यंत ऑनलाइन शिक्षण आसणार आहे.

तलाठी कार्यालयाची इमारत तयार

लोकसहभागातून खर्च : जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते लोकार्पण सोहळा

लोकमत न्यूज नेटवर्क

वावोशी : खालापूर तालुक्यातील होनाड, आत्करगांव ग्रामपंचायत रायगडच्या शेवटच्या टोकावर असून, येथील शेतकऱ्यांना आपला सातबारा मिळविण्यासाठी दोन-तीन किलोमीटर पायपीट करीत साजगांव तलाठी कार्यालयात हेलपाटे मारावे लागत होते. येथील नागरिकांची होणारी परवड लक्षात घेत, जिल्हा परिषद सदस्य नरेश पाटील, होनाड ग्रामपंचायतीचे माजी सरपंच निकेश देशमुख, तसेच आत्करगांव ग्रामपंचायतीचे सदस्य समीर देशमुख यांनी १३ लाख रुपये खर्च करून, सुसज्ज वातानुकूलित तलाठी कार्यालय उभे केले आहे. रायगड जिल्हाधिकारी निधी चौधरी यांच्या हस्ते कार्यालयाचे लोकार्पण सोहळा शनिवार, १ ऑगस्ट २०२० रोजी करण्यात आले आहे.

होनाड तलाठी कार्यालयाच्या उद्घाटन प्रसंगी जिल्हाधिकारी निधी चौधरी, जि.प.माजी सभापती नरेश पाटील, प्रांताधिकारी वैशाली परदेशी आदी.

होनाड तलाठी कार्यालयाची इमारत उभारली असून, लोकार्पण सोहळा कार्यक्रमासाठी जि.प.माजी सभापती नरेश पाटील, प्रांताधिकारी वैशाली परदेशी, तहसीलदार इरेश चप्पलवार, होनाड ग्रामपंचायतीच्या सरपंच अपर्णा निकेश देशमुख, माजी सरपंच निकेश देशमुख, आत्करगांव ग्रामपंचायतीचे सदस्य समीर देशमुख, अमोल देशमुख, उपसरपंच महेश देशमुख यांच्यासह नागरिक उपस्थित होते. होनाड तलाठी अभिजीत हिरवडकर यांनी लोकसहभागातून तलाठी कार्यालय उभे केले असून, ते ज्या तलाठी सजा कार्यालयात जातात, त्या ठिकाणी लोकसहभागातून अशीच कार्यालय उभी करतात, अशी माहिती जिल्हाधिकारी यांना तहसीलदार इरेश चप्पलवार यांनी दिली, तर होनाड येथील सुसज्ज कार्यालय तयार करण्यासाठी लोकप्रतिनिधींनी सहकार्य केल्याबद्दल जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी विशेष कौतुक केले.

नवी मुंबईत कोरोनामुक्तीचा दर ६७ टक्के

लोकमत न्यूज नेटवर्क

नवी मुंबई : शहरात कोरोना रुग्णांची संख्या झपाट्याने वाढत असली, तरी रुग्ण बरे होण्याचे प्रमाण मात्र समाधानकारक आहे. सध्या रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ६७ टक्के इतके आहे. त्यामुळे नवी मुंबईकरांना काही प्रमाणात दिलासा मिळाला आहे.

रविवारी ३८० नवीन रुग्णांची नोंद झाली असून, २८६ रुग्ण बरे होऊन घरी परतले आहेत. नवी मुंबई महापालिका कार्यक्षेत्रात आतापर्यंत १६,१०७ इतक्या रुग्णांची नोंद झाली आहे. रविवारी कोपरखैरणे आणि घणसोलीत अनुक्रमे ६५ आणि ६३ रुग्ण आढळले आहेत, तर नेरुळमध्ये ७७, बेलापूर ५५, वाशी ४१ व तुर्भे परिसरात ३४ नवीन रुग्ण सापडले आहेत.





नागरिकांनी चीननिर्मित वस्तुंवर बहिष्कार टाकावा

स्वदेशीचा वापर करण्याचे आवाहन : युथ फॉरच्युनचे तहसीलदारांना निवेदन

लोकमत न्यूज नेटवर्क

आगरदांडा : चीन देश भारतीय देशाच्या सीमारेषेचे उल्लंघन करून युद्धजन्य परस्थिती निर्माण करीत आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये चिंतेचे व भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. चीन हा देश बाजारपेठा काबीज करण्यासाठी इतर देशावर लष्करी दबाव आणून, काही भाग काबीज करण्याचे षडयंत्र रचत आहे. त्यामुळे भारतीयांनी चीनमध्ये उत्पादित वस्तू खरेदी करू नये. यासाठी युथ फॉरच्युन स्वयंम सेवी संघटनेकडून मुरुडचे तहसीलदार गमन गावीत यांना निवेदन देण्यात आले.

बहिष्कार घालण्यासाठी जनजागृती अभियान : येथील युथ फॉरच्युन स्वयंसेवी संस्थेतर्फे 'चिनी वस्तुंवर बहिष्कार' हा जनजागृतीचा उपक्रम राबवण्यात येणार असून, नागरिकांनी स्वदेशी वस्तू खरेदी करण्याचा आग्रह करण्यात येणार आहे. याबाबत संस्थेने जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक निवेदने देण्यात आली आहेत.

चीनमध्ये तयार झालेल्या राख्या, इलेक्ट्रिक सामानाची खरेदी करू नये. भारतीय बनावटीच्या वस्तुंचा वापर करा. चीन हा भारत देशाचा शत्रू असून, त्या देशातील वस्तू खरेदी करून त्यांची अर्थव्यवस्था बळकट करू नका, यासाठी युथ फॉरच्युन स्वयंम सेवी संघटनेकडून जनजागृती अभियान राबवण्यात येत असून, ठीक ठिकाणी भित्तीपत्रके, बॅनर, होर्डिंग्ज लावून प्रचार करण्यात येत आहे. याबाबतचे निवेदन जिल्हाधिकारी, तहसीलदार, नगराध्यक्ष, व्यापारी असोसिएशन, मुख्याधिकारी यांना देण्यात आले आहे. यावेळी या संघटनेचे सचिव मनोज प्रभाकर रोटकर आदी उपस्थित होते.

अमित शेडगे : श्रीवर्धनमध्ये महसूल दिवस साजरा

संकटात कर्मचाऱ्यांनी केलेले कार्य कौतुकास्पद

लोकमत न्यूज नेटवर्क

श्रीवर्धन : जनतेच्या संकटाच्या काळात महसूल कर्मचाऱ्यांनी केलेले कार्य निर्णायक व महत्त्वाचे आहे. कोरोना व चक्रीवादळ ही दोन्ही संकटे समाजाला धोकादायक ठरली आहेत. समाजातील सर्वसामान्य व्यक्तीचे आरोग्य व जीवित धोक्यात आले असताना, त्याला प्रशासकीय मदत पोहोच करण्याचे काम महसूल विभागातील कर्मचाऱ्यांनी केले आहे. संकटात काम करणाऱ्या लोकांचे काम कौतुकास्पद आहे, असे प्रांताधिकारी अमित शेडगे यांनी सांगितले.

श्रीवर्धन प्रांत कार्यालयाच्या सभागृहात महसूल दिनाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी शेडगे बोलत होते. कोरोना व चक्रीवादळ या दोन्ही संकटांमध्ये सर्वच प्रशासकीय यंत्रणेने अतिशय चांगले काम केलेले आहे. शासनाने सर्वसामान्य व्यक्तीला दिलेली मदत त्यांच्यापर्यंत पोहोच करण्यासाठी आपण सर्वांनी अथक परिश्रम केलेले आहेत. शासनाकडून चक्रीवादळाच्या संदर्भात आलेल्या आदेशानुसार आपण काम केलेले आहे. सर्व कर्मचाऱ्यांनी आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करत, आपले दायित्व आपले कर्तव्य पार पाडले आहे. महसूल दिनाची परंपरा फार पूर्वीपासून आहे. दिवसेंदिवस या परंपरेमध्ये आमूलाग्र बदल घडल्याचे आपल्या निदर्शनास येत आहे. महसूल दिन साजरा करण्यासंदर्भात वेगवेगळी परिपत्रके अनेक वर्षांपासून शासन निर्गमित करत आहे. महसूल दिनाचे औचित्य साधून आज आपण आपल्या महसूल विभागातील सर्व कर्मचाऱ्यांची अँटिजेन कोविड टेस्ट करत आहोत असे त्यांनी सांगितले.

महसूल दिनाच्या प्रसंगी प्रांताधिकाऱ्यांच्या हस्ते महसूल विभागातील विविध कर्मचाऱ्यांचा प्रशस्तिपत्रक देऊन सन्मान करण्यात आला. जिल्हाधिकारी निधी चौधरी यांच्या आदेशानुसार, श्रीवर्धन रुग्णालयातील डॉक्टर मयुर हेगडे, माधुरी दीक्षित व डॉक्टर सलीम डालाईत यांच्या टीमने सर्व उपस्थित कर्मचाऱ्यांची कोविड अँटिजन टेस्ट व नेत्र चाचणी केली आहे. यावेळी तहसीलदार सचिन गोसावी, मंडळ अधिकारी कल्याण देऊळगावकर, नायब तहसीलदार रामभाऊ गिरी, तलाठी अर्जुन भगत आदी कर्मचारी उपस्थित होते.

महसूल दिनी कमचाऱ्यांना मागदर्शन करताना प्रांताधिकारी अमित शेडगे.

लोकमत CLASSIFIEDS classified online क्लिक करा बुक करा http://online.lokmatclassified.com

शैक्षणिक

शैक्षणिक

हमखास पासाची गॅरंटी खर्डीकर क्लासेस 7वी नापास? डायरेक्ट 10वी, 11वी नापास? डायरेक्ट 12वी डोंबिवली, ठाणे, बदलापूर, दिवा, टिटवाळा: 9820627580/ 9820904646. (350433)

ज्योतिषविषयक

ज्योतिष

फीस नही इनाम लूंगा, बाबा विशाल शास्त्री गोल्ड मेडलिस्ट स्पे.महावशीकरण, मुठकरनी, गृहक्लेश, प्रेमविवाह, तलाक, मनचाहा प्यार/ शादी रुठे को मनाना घरबैठे A to Z समाधान 9634156121 (352639)

विवाहविषयक

वर पाहिजे

वधू ३७, सरकारी नोकरी, वधू घटस्फोटीत, वधुला रिलेशन शीप करिता युवकाची आवश्यकता आहे. इंटरकास्ट मान्य. वयाची अट नाही. मो.नं. 9146509053, 7840934921 (354858)

लोकमत

वाचकांना विनम्र सूचना

लोकमत वृत्तपत्रातून प्रसिध्द होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची लोकमत वृत्तपत्र समूह कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल लोकमत वृत्तपत्र समूहाचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाहीत, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.